**एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत अंगणवाडी सेविका, मिनी अंगणवाडी सेविका व मदतनीस यांच्या नियुक्तीच्या अटी व शर्ती निश्चित करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
महिला व बाल विकास विभाग
शासन निर्णय क्र. एबावि-२००७/प्र.क्र.२६/का.६
नवीन प्रशासन भवन, ३ रा मजला,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- ५ ऑगस्ट, २०१०

वाचा : १. शासन निर्णय, महिला व बाल विकास विभाग क्र. एबावि २००४/प्रक्र. २०३/का.६, दि.९.२.२००५
२. शासन निर्णय, महिला व बाल विकास विभाग क्र. एबावि २००४/प्रक्र. २०६/का.६, दि.२८.१२.२००५
३. शासन निर्णय, महिला व बाल विकास विभाग क्र.एबावि-२००७/प्र.क्र.१४३/का.६, दि.१२.३.२००८
४. शासन निर्णय, महिला व बाल विकास विभाग क्र.एबावि-२००९/प्र.क्र.११७/का.६, दि.२५.११.२००९
५. शासन निर्णय, महिला व बाल विकास विभाग क्र.एबावि-२००९/प्र.क्र.११७/का.६, दि. ५.०२.२०१०

**प्रस्तावना** :- एकात्मिक बाल विकास सेवा योजना ही केंद्र पुरस्कृत योजना असून या योजनेंतर्गत अंगणवाडयांमधील अंगणवाडी सेविका, मिनी अंगणवाडी सेविका व मदतनीस या मानधनी कर्मचा-यांच्या नियुक्तीसंदर्भात शासनाने विहीत कार्यपध्दती ठरवून दिलेली आहे. एखादया भागात एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत अथवा राज्य शासनामार्फत नवीन अंगणवाडया सुरु झाल्यानंतर त्या भागातील मिनी अंगणवाडी सेविका/ बालवाडी शिक्षिका यांना अंगणवाडी सेविका, मदतनीस म्हणून नियुक्ती देण्यासंदर्भात शासनाने वर नमूद केलेल्या संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयान्वये, पूर्वीचे सर्व शासन निर्णय अधिक्रमित केले होते. त्यानंतर प्रशासनातील सुसूत्रीकरणाच्या दृष्टीने संदर्भाधिन क्र.१ येथील शासन निर्णय अधिक्रमित करुन संदर्भाधिन क्र.३ येथील सुधारित शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे. तरीसुध्दा यासंदर्भातील थेट नियुक्त्या व उमेदवारांची निवड अधिक पारदर्शकपणे व्हाव्यात यासाठी दिनांक १२.३.२००८ च्या शासन निर्णयात सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार दिनांक १२.३.२००८ चा शासन निर्णय अधिक्रमित करुन खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.

**शासन निर्णय**

**१. थेट नियुक्ती :-**

अ) एकात्मिक बाल विकास सेवा योजना या केंद्र पुरस्कृत योजनेंतर्गत राज्यात ज्या ठिकाणी नवीन अंगणवाडया सुरु करण्यात येतील, अशा ठिकाणी यापूर्वी ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद, महानगर पालिका, नगरालिका व कॅन्टोनमेंट बोर्ड (कटक मंडळे) समाज कल्याण विभाग, शिक्षण विभाग केंद्रीय व राज्य समाज कल्याण सल्लागार बोर्ड यांच्या बालवाडया सुरु असतील तर, बालवाडी बंद करण्यात येऊन तेथील बालवाडी शिक्षिका हीला १० वी उत्तीर्ण असल्यास नविन अंगणवाडी केंद्रातील, **"अंगणवाडी सेविका"** या मानधनी पदावर थेट नियुक्ती देण्यात यावी. जर १० वी उत्तीर्ण नसेल तर अशा बालवाडी शिक्षिकेला **"अंगणवाडी मदतनीस"** म्हणून थेट नियुक्ती देण्यात यावी. या तरतुदीनुसार खाजगी अथवा स्वयंसेवी संस्थेमार्फत (जरी कोणत्याही

विभागाकडून अनुदान मिळत असेल तरीही) चालविण्यात येणा-या बालवाडी केंद्रातील शिक्षिकांना अंगणवाडी सेविका / मदतनीस म्हणून थेट नियुक्तीसाठी विचार करता येणार नाही.

ब) मिनी अंगणवाडी केंद्राचे, अंगणवाडी केंद्रात रुपांतर झाल्यास मिनी अंगणवाडी सेविकेस, जर ती किमान १० वी पास असेल तर तिला **"अंगणवाडी सेविका"** म्हणून, जर १० वी उत्तीर्ण नसेल तर **"मदतनीस"** म्हणून थेट नियुक्ती देण्यात यावी.

क) अंगणवाडी सेविकेचे पद रिक्त झाले असेल व त्या अंगणवाडी केंद्रातील कार्यरत **"मदतनीस"** आवश्यक ती अर्हता, स्थानिक रहिवाशी अट व मदतनीस म्हणून २ वर्षाची सेवा / अनुभव या अटींची पुर्तता करीत असल्यास तिला **"अंगणवाडी सेविका"** म्हणून थेट नियुक्ती देण्यात यावी.

**२. अर्ज मागवून उमेदवारांची निवड करण्यासाठी आवश्यक अटी व शर्ती :-** थेट नियुक्तीची प्रकरणे निकाली काढल्यानंतर शिल्लक असलेल्या रिक्त पदांसाठी जाहिरातीद्वारे अर्ज मागवून उमेदवारांची निवड करण्यात यावी. यासाठी अटी व शर्ती खालीलप्रमाणे निश्चित करण्यात येत आहेत.

**(अ) शैक्षणिक पात्रता :-** सर्व प्रकल्पातील अंगणवाडी सेविका आणि मिनी अंगणवाडी सेविका पदासाठी १० वी उत्तीर्ण, मदतनीस पदासाठी ७ वी उत्तीर्ण अशी किमान शैक्षणिक पात्रता आवश्यक राहील.

**(ब) वास्तव्याची (स्थानिक रहिवाशी असणे) अट :-** ग्रामीण आणि आदिवासी प्रकल्पातील अंगणवाडी सेविका, मिनी अंगणवाडी सेविका व मदतनीस या पदावर फक्त त्या ग्रामपंचायत क्षेत्रातील, नागरी प्रकल्पा संबंधात त्याच वार्डातील महिला उमेदवारांकडून जाहिरातीद्वारे अर्ज मागवून निवड करावी.

**(क) वयाची अट :-** अंगणवाडी सेविका, मिनी अंगणवाडी सेविका व मदतनीस या पदावर सरळ नियुक्तीसाठी (By nomination) वयोमर्यादा २५ ते ३५ वर्षे अशी राहील. परंतु, वरील परि. १ च्या अ), ब) व क) खालील तरतूदीनुसार करण्यात येणा-या थेट नियुक्तीसाठी कमाल (Maximum) वयोमर्यादा, ३५ वर्षे ही वयाची अट लागू राहणार नाही.

**(ड) लहान कुटुंब :-** अंगणवाडी सेविका, मदतनीस व मिनी अंगणवाडी सेविका या पदांसाठी लहान कुटूंब ही अट लागू करण्यात येत आहे. ती खालीलप्रमाणे लागू राहील.

(१) लहान कुटूंब याचा अर्थ, दोन मुले यांसह पत्नी व पती असा आहे.

(२) मानधनी पदांसाठी अर्ज करतांना नियुक्ती झालेल्या उमेदवारास, दोनपेक्षा जास्त अपत्य होऊ देणार नाही, असे लेखी प्रतिज्ञापत्र लिहून द्यावे लागेल. ते **परिशिष्ट "ब"** प्रमाणे राहील.

(३) सदर नियम अंमलात आल्याच्या दिनांकाला किंवा त्यानंतर केवळ एकच मूल असेल त्याबाबतीत, नंतरच्या एकाच प्रसुतीस जन्मलेल्या कोणत्याही एकापेक्षा अधिक मुलांना एकच अपत्य म्हणून समजण्यात येईल. मुल / अपत्य यामध्ये दत्तक घेतलेल्या मुलाचा किंवा मुलांचा समावेश होणार नाही.

**(इ) प्राधान्य :-** निवड करतांना खालील नमूद केलेल्या क्रमाने प्राधान्य देण्यात यावे.

**(i) विधवा व अनाथ मुली :-** (१) आत्महत्या केलेल्या शेतक-याची विधवा (स्थानिक) (अमरावती, बुलढाणा, अकोला, वाशिम, यवतमाळ व वर्धा या जिल्हयांकरिता), (२) शासकीय संस्थेत रहात असलेली विधवा (स्थानिक), (३) शासन अनुदानित संस्थेत रहात असलेली विधवा (स्थानिक), (४) इतर स्थानिक विधवा (स्थानिक),

(५) शासकीय संस्थेत रहात असलेल्या अनाथ मुली (स्थानिक), (६) शासन अनुदानित संस्थेत रहात असलेल्या अनाथ मुली (स्थानिक)

**टिप :- अनु.क्र.१ करिता संबंधित तालुक्याचे तहसिलदार, अनु.क्र.२, ३, ५, ६ करीता संबंधित जिल्हयांचे जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी आणि अनु.क्र.४ करिता संबधित तालुक्याचे गट विकास अधिकारी (BDO) यांचे प्रमाणपत्र आवश्यक राहील.**

**(फ) अनुभव :-** सोबतच्या परिशिष्ट **"अ"** मधील भाग-१ मध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे, सेवा / अनुभव असल्यास त्याबद्दल गुण देण्याकरिता यापुढे एकात्मिक बाल विकास सेवा योजनेची अंगणवाडी / मिनी अंगणवाडी, जिल्हा परिषद, समाजकल्याण विभाग, केंद्रीय व राज्य समाजकल्याण बोर्ड, महानगरपालिका / नगरपालिका/ परिषद, केंटॉन्मेंट बोर्ड (कटक मंडळ) अशा शासनमान्य संस्थेतील अनुभव असल्यास गुण देण्यात यावेत. ***या प्रयोजनासाठी खाजगी संस्थेतील सेवा / अनुभव ग्राहय धरण्यात येऊ नयेत. अशी खाजगी संस्था मान्यताप्राप्त अथवा अनुदानित संस्था असली तरीही अशा संस्था मधील अनुभव ग्राहय धरण्यात येऊ नये, कारण तेथील शिक्षिकांची नियुक्ती खाजगी संस्थांकडून केलेली असते.***

**(ग)** अल्पसंख्यांक :- अल्पसंख्यांक समाजाची प्राबल्य असलेले महाराष्ट्र राज्याच्या ८ जिल्हयातील २६ बाल विकास प्रकल्प केंद्र शासनाने निश्चित केलेले आहेत. या २६ प्रकल्पांच्या नियंत्रणाखाली एकूण ४,४४३ अंगणवाडी केंद्र मंजूर आहेत. या अंगणवाडी केंद्रांपैकी ज्या अंगणवाडी केंद्राच्या क्षेत्रातील ५०% पेक्षा जास्त लोकसंख्या अल्पसंख्यांक समाजाची आहे, अशा अंगणवाडी केंद्रातील, अंगणवाडी सेविका, मिनी अंगणवाडी सेविका व मदतनीस पदे ज्या महिला उमेदवारांना ऊर्दू लेखी व तोंडी ज्ञान अवगत असेल अशा उमेदवारांकडूनच अर्ज मागविण्यात यावेत.

**३. पात्र उमेदवारांची मुलाखतीपूर्वी यादी तयार करुन प्रसिध्द करणे :-** अंगणवाडी सेविका, मदतनीस व मिनी अंगणवाडी सेविका यांची पदे रिक्त झाल्यानंतर ३० दिवसांच्या आत स्थानिक वर्तमानपत्रात जाहिरात देऊन अर्ज मागविण्यात यावेत. या पदांकरिता लेखी परिक्षा घेण्यात येऊ नयेत. **प्राप्त अर्ज / उमेदवारांची प्राथमिक यादी** ज्यात गुण जात, इत्यादीसारख्या त्यांच्या प्रमाणपत्रावरुन त्यांना परिशिष्ट **"अ"** च्या भाग १ प्रमाणे निश्चित गुण देऊन परिशिष्ट **"क"** मध्ये उल्लेख केलेल्या तक्त्याप्रमाणे नोटीस बोर्डावर जाहिर करण्यात यावी. सदर यादी गुणवत्ता (MERIT) प्रमाणे उमेदवाराला पदवी / बारावी / दहावी बोर्डाच्या परिक्षेमध्ये प्राप्त झालेल्या गुणांप्रमाणे जाहिर करण्यात यावी. त्यात सर्वात जास्त गुण असलेल्या उमेदवाराचे नांव सर्वात वर व त्यापेक्षा कमी गुण प्राप्त असलेल्या उमेदवाराचे नांव त्याखाली याप्रमाणे असावे. अर्ज प्राप्त करण्याच्या अंतिम तारखेनंतर ३ दिवसांच्या आत सदर यादी, ३ उमेदवारांची स्वाक्षरी घेऊन जिल्हयाचे कार्यालय, संबंधित पंचायत समिती / बाल विकास प्रकल्प कार्यालय व ग्रामपंचायतीच्या नोटीस बोर्डावर लावण्यात यावी. सदर यादी प्राथमिक असून उमेदवारांनी स्वतः दिलेल्या माहितीच्या आधारावर लावण्यात यावी. उदा. जात, गुण, वय, अपत्य, विधवा, इत्यादी. बाल विकास प्रकल्प अधिकारी यांनी प्राप्त अर्जाची १० दिवसांच्या आत सखोल तपासणी करण्यात यावी. तसेच नोटीस बोर्डावर यादीतील कोणत्याही उमेदवाराचे प्रमाणपत्र व त्याबाबतचे दिलेले गुण याबाबत तक्रार असल्यास अर्ज केलेल्या उमेदवारांनी, यादी घोषित केल्याच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत संबंधित बाल विकास प्रकल्प अधिकारी यांच्याकडे लेखी तक्रार करावी. तक्रारीची १५ दिवसांच्या आत शहानिशा करुन, जर उमेदवाराच्या एकूण गुणात बदल झाला असल्यास तशी नोंद **लाल शाईने** गुणवत्ता यादीत (MERIT LIST) सुधारणा करण्यात यावी.

वरीलप्रमाणे सखोल तपासणी व तक्रार प्राप्त झाली असल्यास तक्रारीची शहानिशा केल्यानंतर सुधारित केलेल्या यादीपैकी अंगणवाडी केंद्रनिहाय एका पदासाठी वरच्या फक्त ५ (Top Five) उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलविण्यात यावे. मात्र त्याशिवाय **विधवा व शासकीय किंवा शासन अनुदानित संस्थेत राहत असलेल्या अनाथ मुली** यांनाही **(त्यांना कितीही गुण मिळाले असले तरी)** मुलाखतीसाठी बोलविण्यात यावे. याव्यतिरिक्त कमी गुण मिळालेल्या उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलविण्यात येऊ नये.

वर नमूद केल्याप्रमाणे मुलाखतीस बोलविण्यासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी **परिशिष्ट ''ड''** प्रमाणे तयार करुन त्यांनाच मुलाखतीसाठी बोलविण्यात यावे. सदर यादीवर सुध्दा ३ उमेदवारांची स्वाक्षरी घेऊन ती नोटीस बोर्डावर जाहिर करण्यात यावी. मुलाखतीच्या किमान २ दिवसांपुर्वी सदर यादी नोटीस बोर्डावर लावावी. **परिशिष्ट ''क'' व ''ड'' प्रमाणे उमेदवाराची यादी नोटीस बोर्डवर लावल्याशिवाय मुलाखती घेण्यात येऊ नयेत.** तसेच या नोटीसा बोर्डावर लावण्याचा दिनांक व मुलाखतीचा दिनांक यात कोणत्याही परिस्थित १० दिवसांपेक्षा जास्त कालावधी नसावा. मुलाखतीचा कार्यक्रम शक्यतो पुढे ढकलू नये.

**४. मुलाखतीची प्रक्रिया व उमेदवारांची निवड करणे :-** मुलाखत झाल्यानंतर निवडसमितीच्या उपस्थित सर्व सदस्यांनी १० गुणांपैकी दिलेल्या सर्व गुणांची बेरीज करुन त्याची सरासरी काढण्यात यावी. याप्रमाणे मुलाखतीत सरासरी प्राप्त झालेले गुण + कागदपत्रांच्या आधारे मिळालेले (नोटीस बोर्डावर लावलेल्या परिशिष्ट **''क''** मधील यादीप्रमाणे) गुण यांची बेरीज करुन मिळालेल्या एकूण गुणांची यादी गुणवत्तेनुसार मुलाखतीच्या दिवशीच **संध्याकाळपर्यंत** मुलाखतीच्या ठिकाणीच घोषित करुन उमेदवाराची निवड जाहिर करण्यात यावी. (**परिशिष्ट ''ड'' मधील यादीतील उमेदवाराच्या समोर निवड समितीच्या उपस्थित सदस्यांच्या स्वाक्षरीनिशी निवड झाल्याची नोंद करावी.**)

परंतु, उमेदवाराची निवड निश्चित करतांना जर एकापेक्षा जास्त उमेदवारांना सारखेच गुण प्राप्त झाल्यास अशा प्रसंगी सर्वात जास्त शैक्षणिक अर्हता, वय (जन्मदिनांक विचारात घ्यावा), अनुभव, हया बाबी (कसोटी) क्रमाक्रमाने विचारात घेऊन यापैकी कोणत्याही बाबीत सर्वात श्रेष्ठ ठरलेल्या उमेदवाराची निवड घोषित करण्यात यावी.

**५. निवड प्रक्रियेविरुध्द तक्रार व अपिल करणे :-** अंगणवाडी सेविका, मदतनीस / मिनी अंगणवाडी सेविका या मानधनी पदावरील घोषित निवडीसंदर्भात कोणत्याही उमेदवाराची त्याच्यावर अन्याय झाल्याची तक्रार असल्यास त्यांनी, ग्रामीण व आदिवासी प्रकल्पाच्या बाबतीत संबंधित मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद व नागरी प्रकल्पाच्या बाबतीत संबंधित जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांचेकडे निवड यादी घोषित झाल्यापासून ३० दिवसांच्या आत तक्रार करावी. या अधिका-यांनी तक्रारीची सत्यता पडताळून निर्णय घ्यावा. आवश्यक असल्यास तक्रारदारास त्याचे म्हणणे मांडण्याची संधी देऊन (सुनावणी घेऊन) निर्णय द्यावा. अशाप्रकारे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, किंवा जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयामुळे तक्रारदाराचे समाधान झाले नसल्यास या अधिका-यांच्या निर्णयाविरुध्द ग्रामीण व आदिवासी प्रकल्पांच्या बाबतीत संबंधित विभागीय आयुक्त (महसूल) व नागरी प्रकल्पाच्या बाबतीत आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई यांचेकडे अपिल करता येईल. या तरतूदीमुळे संदर्भाधिन क्र.४ व ५ येथील शासन निर्णय महिला व बाल

विकास विभाग, क्र.एबावि-२००९/प्र.क्र.११७/का.६, दिनांक २५ नोव्हेंबर, २००९ व दिनांक ५ फेब्रुवारी, २०१० याद्वारे रद्द करण्यात येत आहेत.

**६. सेवासमाप्तीसाठी वयाची अट :-** एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत अंगणवाडी सेविका, मिनी अंगणवाडी सेविका व मदतनीस हे मानधनी कर्मचारी असल्यामुळे, त्यांना शासकीय कर्मचा-यांप्रमाणे नियत वयोमानाचे सेवानिवृत्तीच्या वयाची अट, म्हणजे ५८ वर्षे वयाची अट लागू नाही. त्यामुळे मानधनी सेवा त्यांचे वय ६५ वर्षे पूर्ण होईपर्यंत किंवा त्या शारिरिकदृष्टया काम करण्यास सक्षम असेपर्यंत **यापैकी जे आधी घडेल** तोपर्यंतच सुरु ठेवण्यात यावी.

**७.** जाहिरातीनुसार केलेल्या अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रांची काळजीपूर्वक तपासणी करुन घ्यावी. अर्जासोबत असलेल्या कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती सक्षम प्राधिका-याकडून साक्षांकित केलेल्या असाव्यात. ज्या प्रमाणपत्रात खाडाखोड असेल, किंवा त्या प्रमाणपत्राबाबत शंका वाटत असल्यास, मूळ प्रमाणपत्र प्राप्त करुन घेऊन सदर कागदपत्राची सत्यता पडताळून पहावी. निवड समितीने गुणानुक्रमानुसार ज्या उमेदवारांची निवड केली असेल त्या उमेदवाराने अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रांच्या, मूळ कागदपत्रांची तिला हजर करुन घेण्यापूर्वी न चूकता पडताळणी करुन घ्यावी. ज्या प्रकरणी कोणत्याही प्रकारची शंका असेल अशी प्रकरणे तात्काळ वरिष्ठ अधिका-यांच्या निदर्शनास आणून द्यावीत.

**८.** सदर शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून लागू राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

सही / -
(ज. कि. मगरे)
सह सचिव

प्रति,

मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई
मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
मा. उपमुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
मा. मंत्री / राज्यमंत्री, महिला व बाल विकास, मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई
आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना,नवी मुंबई,
आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे
सर्व मंत्रालयीन विभाग.
महासंचालक, महिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई
सर्व विभागीय आयुक्त
ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय ग्रंथालय, विधान भवन, मुंबई
सर्व जिल्हाधिकारी
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
सर्व उप मुख्य कार्यकारी अधिकारी, (बाल कल्याण)
सर्व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी
सर्व बाल विकास प्रकल्प अधिकारी (ग्रामीण / आदिवासी / नागरी)
बहुजन समाज पार्टी, डी-१ इन्सा हटमेंट, आझाद मैदान, मुंबई - १
भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश, सी.डी.ओ.बॅरॅक नं.१, योगक्षेम समोर, नरीमन पॉईंट, मुंबई - २०
भारतीय कम्युनिस्ट पार्टी, महाराष्ट्र कमिटी, ३१४, राजभुवन, एस.व्ही.पटेल रोड, मुंबई - ४
भारतीय कम्युनिस्ट पार्टी (मार्क्सवादी), महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस, वरळी, मुंबई - १३
इंडियन नॅशनल काँग्रेस, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस (आय) समिती, टिळक भवन, दादर, मुंबई - २५
नॅशनलिस्ट काँग्रेस पार्टी, राष्ट्रवादी भवन, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरीमन पॉईंट, मुंबई - २१
शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई - २८
महिला व बाल विकास विभागातील सर्व कार्यासने
निवड नस्ती (कार्यासन ६)

## परिशिष्ट "अ" भाग - १

| बाब | एकूण गुण | अंगणवाडी सेविका व मिनी अंगणवाडी सेविका (किमान अर्हता १० वी उत्तीर्ण) | | अंगणवाडी मदतनीस (किमान अर्हता ७ वी उत्तीर्ण) | |
|---|---|---|---|---|---|
| | | शैक्षणिक अर्हता | सर्व प्रकल्पांसाठी | शैक्षणिक अर्हता | सर्व प्रकल्पांसाठी |
| शैक्षणिक पात्रता | ७० गुणापर्यंत | १) पदवीधर | ६० | १) बारावी | ६० |
| | | ७१ % व त्यापेक्षा जास्त | + १० | ७१ % व त्यापेक्षा जास्त | + १० |
| | | ७० % ते ६५ % | + ९ | ७० % ते ६५ % | + ९ |
| | | ६४ % ते ६० % | + ८ | ६४ % ते ६० % | + ८ |
| | | ५९ % ते ५५ % | + ७ | ५९ % ते ५५ % | + ७ |
| | | ५४ % ते ५० % | + ६ | ५४ % ते ५० % | + ६ |
| | | ४९ % ते ४५ % | + ५ | ४९ % ते ४५ % | + ५ |
| | | ४४ % ते ४० % | + ४ | ४४ % ते ४० % | + ४ |
| | | ३९ % ते ३५ % | + ३ | ३९ % ते ३५ % | + ३ |
| | | २) बारावी | ५० | २) दहावी | ५० |
| | | ७१ % व त्यापेक्षा जास्त | + १० | ७१ % व त्यापेक्षा जास्त | + १० |
| | | ७० % ते ६५ % | + ९ | ७० % ते ६५ % | + ९ |
| | | ६४ % ते ६० % | + ८ | ६४ % ते ६० % | + ८ |
| | | ५९ % ते ५५ % | + ७ | ५९ % ते ५५ % | + ७ |
| | | ५४ % ते ५० % | + ६ | ५४ % ते ५० % | + ६ |
| | | ४९ % ते ४५ % | + ५ | ४९ % ते ४५ % | + ५ |
| | | ४४ % ते ४० % | + ४ | ४४ % ते ४० % | + ४ |
| | | ३९ % ते ३५ % | + ३ | ३९ % ते ३५ % | + ३ |
| | | ३) दहावी | ४० | ३) सातवी | ४० |
| | | ७१ % व त्यापेक्षा जास्त | + १० | ७१ % व त्यापेक्षा जास्त | + १० |
| | | ७० % ते ६५ % | + ९ | ७० % ते ६५ % | + ९ |
| | | ६४ % ते ६० % | + ८ | ६४ % ते ६० % | + ८ |
| | | ५९ % ते ५५ % | + ७ | ५९ % ते ५५ % | + ७ |
| | | ५४ % ते ५० % | + ६ | ५४ % ते ५० % | + ६ |
| | | ४९ % ते ४५ % | + ५ | ४९ % ते ४५ % | + ५ |
| | | ४४ % ते ४० % | + ४ | ४४ % ते ४० % | + ४ |
| | | ३९ % ते ३५ % | + ३ | ३९ % ते ३५ % | + ३ |
| शिक्षणशास्त्र प्रमाणपत्र (C. Ed.) असल्यास | | | ०५ | | ०५ |
| Bachelor of Education (B.Ed.) असल्यास | | | १० | | १० |
| अनुसूचित जाती / अनुसूचित जमाती. | | | ०३ | | ०३ |
| विमुक्त / भटक्या जाती/ जमाती / इतर मागासवर्गीय /वि.मा.प्र. | | | ०२ | | ०२ |
| २ वर्षापेक्षा जास्त अनुभव (शासन निर्णयातील परि.२ (फ)<br>(अ) २ ते ४ वर्षापर्यंतचा अनुभव असल्यास<br>(ब)४ वर्ष व त्यापेक्षा जास्त अनुभव असल्यास | | | ०१ गुण<br>०२ गुण | | ०१ गुण<br>०२ गुण |

## भाग - २

| मुलाखतीचे गुण १० | अंगणवाडी सेविका, मिनी अंगणवाडी सेविका व मदतनीस |
|---|---|
| एकात्मिक बाल विकास सेवा योजनेशी संबंधित माहितीचे ज्ञान | ०४ गुणापर्यंत |
| शारिरीक क्षमता (physical fitness) | ०२ गुणापर्यंत |
| व्यक्तिमत्वासाठी (Personality) | ०२ गुणापर्यंत |
| एकमेकांशी संवाद साधण्याची कला Communication Skills | ०२ गुणापर्यंत |

* टिप :- भाग-२ मधील गुण मुलाखतीच्यावेळी योग्यतेनुसार देण्यात यावेत. मुलाखतीसाठी अंतीमरित्या नोटीस बोर्डावर लावलेल्या यादीतील पहिले ५ उमेदवार, विधवा व शासकीय किंवा शासन अनुदानित संस्थेतील अनाथ मुली यांनाच बोलावण्यात यावे.

# परिशिष्ट "ब"

## प्रतिज्ञापत्र

मी, श्रीमती. ----------------------------------------------------------------------------,
श्री. / श्रीमती -------------------------------- यांची मुलगी / पत्नी, वय --------- वर्षे, राहणार ------------
------------------------------------------------------ याद्वारे पुढीलप्रमाणे असे जाहिर करते की,
(१) मी ------------------ या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.
(२) आज रोजी मला खालीलप्रमाणे मुले आहेत.

| अ. क्र. | मुलाचे / मुलीचे नांव | जन्मारीख | वय |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |

(३) हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल, किंवा भविष्यात दोनपेक्षाअधिक मुले झाल्यास, मानधनी पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास किंवा कमी करण्यास पात्र होईल, याची मला जाणीव आहे.
(४) मला दोनपेक्षा जास्त मुले होणार नाहीत यासाठी मी कुटुंबनियोजन करुन घेण्याची प्रतिज्ञा करते.

ठिकाण :-

दिनांक :- (नांव व सही)

------------------------------------

# परिशिष्ट "क"

**(नोटीस बोर्डावर (Merit List of Candidates) प्रसिध्द करावयाची सर्व अर्ज करणा-या उमेदवारांची यादी)**

| अ. क्र. | उमेदवारांचे | | जन्मदिनांक, वय व असलेल्या अपत्यांची संख्या | शैक्षणिक पात्रता व प्राप्त गुण (Mark Sheet प्रमाणे) व त्याबद्दल मिळालेले गुण | मागासवर्गीय असल्यास जात किंवा पोटजात व त्याबद्दल मिळालेले गुण | अनुभव असल्यास किती वर्ष व त्याबद्दल मिळालेले गुण | एकूण प्राप्त गुण | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | नांव | रहिवाशी पत्ता | | | | | | |
| | | | | | | | | |

**टिप :- १) वरील निवड यादीत अर्ज केलेल्या उमेदवारांची नांवे त्यांनी धारण केलेले शेक्षणिक अर्हतेनुसार व Mark Sheet मध्ये मिळालेल्या गुणांच्या descending Order नुसार दर्शविण्यात यावीत. (आधी पदवीधर, नंतर बारावी, नंतर दहावी याप्रमाणे व प्रत्येक संवर्गात गुणांच्या descending Order मध्ये)**

**२) वरील यादीतील कोणत्याही उमेदवारांची वैयक्तिक माहिती खोटी असल्याची अर्ज केलेल्या उमेदवारांची तक्रार असल्यास, यादी प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांच्या आत संबंधित बाल विकास प्रकल्प अधिकारी यांच्याकडे लेखी स्वरुपात तक्रार करावी. त्यानंतर प्राप्त झालेल्या तक्रारींची कोणत्याही परिस्थितीत दखल घेतली जाणार नाही.**

**३) वरीलप्रमाणे प्रसिध्द केलेल्या यादीतील कोणत्याही उमेदवारास मिळालेल्या गुणांबाबत तक्रार प्राप्त झाल्यास, तक्रारीची शहानिशा करुन त्यानंतर निश्चित केलेल्या यादीतील एका पदासाठी पहिल्या १ ते ५ येथील उमेदवारांना, विधवा व शासकीय तसेच शासन अनुदानित संस्थेतील अनाथ मुली, यांनाच मुलाखतीसाठी बोलविण्यात येईल.**

# परिशिष्ट "ड"

**(मुलाखतीस बोलावण्याकरिता पात्र ठरलेल्या उमेदवारांच्या नावासमोर '✓' चिन्ह आहे. )**

| अ. क्र. | उमेदवारांचे नांव | परिशिष्ट अ च्या भाग - १ मधील मिळालेले निश्चित गुणांची सविस्तर माहिती | शेरा |
|---|---|---|---|
| १ | | | |
| २ | | | |
| ३ | | | |
| ४ | | | |
| ५ | | | |
| ६ | | | |
| ७ | | | |
| ८ | | | |
| ९ | | | |
| १० | | | |

टिप :- (१) १ ते ५ येथील नांव सर्वात जास्त शैक्षणिक अर्हता व मिळालेले गुण यांच्या आधारे (Descending Order प्रमाणे) निश्चित करावी. उर्वरीत क्र. ६ व त्या पुढील नावे मुलाखतीस बोलावण्यास पात्र असलेल्या विधवा व शासकीय तसेच शासन अनुदानित संस्थेतील अनाथ मुली, इत्यादी. यांची सुध्दा शैक्षणिक अर्हतेप्रमाणे यादी घोषित करावी. त्यांच्या नावासमोर त्या ज्या गटातील असतील ते स्पष्टपणे नमूद करावे. उदा. विधवा व शासकीय तसेच शासन अनुदानित संस्थेतील अनाथ मुली, इत्यादी.

(२) सर्वात जास्त गुण मिळालेल्या उमेदवाराची शिफारस निवड समितीच्या सर्व उपस्थित सदस्यांची स्वाक्षरीनिशी परिशिष्ट ड मधील यादी संबंधित उमेदवारांच्या नावासमोर नोंद करुन घोषित करावी.

*     *     *     *     *